# महाराष्ट्र शासन
# महिला व बाल विकास विभाग
# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,
# महाराष्ट्र राज्य,नवी मुंबई

## सळसेवा भरती जाहिरात क्रमांक -01 / 2024

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभाग यांचे एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय महाराष्ट्र राज्य , नवी मुंबई या आयुक्तालयाचे अधिनस्त 104 नागरी प्रकल्पा मधील **गट-क संवर्ग, मुख्यसेविका नागरी प्रकल्प** (वेतनश्रेणी-एस-13 -35400-112400) यांची सरळसेवेने 102 रिक्त पदे भरण्या करिता पात्र **महिला उमेदवारा कडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत**.

सदरील रिक्त पदभरती प्रक्रियेशी संबंधित सविस्तर जाहिरात व ऑनलाईन अर्ज भरण्या बाबतची सुविधा एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय महाराष्ट्र राज्य , नवी मुंबई या आयुक्तालयाचे https://www.icds.gov.in या संकेतस्थळावर **दि**.14.10.2024 पासून उपलब्ध करून देणेत येत आहे. उमेदवाराने संकेतस्थळावरील संपुर्ण जाहिरात काळजीपुर्वक वाचून केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परिक्षा शुल्क ग्राह्य धरण्यात येतील याची नोंद घ्यावी.इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज व परिक्षा शुल्क ग्राह्य धरले जाणार नाही .

भरती करावयाच्या पदाची वेतन श्रेणी ,संवर्ग निहाय आरक्षण व पदसंख्या, संबंधित पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता, परीक्षा अभ्यासक्रम व इतर अर्हता जाहिरातीमध्ये सविस्तर नमूद करण्यात आलेल्या आहेत. सदरील भरती प्रक्रिया केवळ ऑनलाईन पद्धतीन (Computer Based Test) परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेसंदर्भात सर्व कार्यक्रम वेळापत्रक,वेळापत्रकातील बदल व सुचना या आयुक्तालयाचे संकेतस्थळ https://www.icds.gov.in वर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील व त्या सर्वांना बंधणकारक राहतील. या बाबत अर्ज करणाऱ्या उमेदवारांशी स्वतंत्रपने कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 1 | **परीक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याचा सूरूवात दिनांक** | **दिनांक . 14.10.2024 रोजी दुपारी 11.00 वाजले पासून** |
| 2 | **परीक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक. 03.11.2024 रोजी रात्री 11.55 वाजे पर्यंत** |
| 3 | **परीक्षे करीता ऑनलाईन प्रवेशपत्र व परीक्षेचा दिनांक उपलब्ध होण्याचा दिनांक** | **या आयुक्तालयाचे संकेतस्थळ** https://www.icds.gov.in **यावरून कळविण्यात येईल** . |

वरील रिक्त पद भरती बाबतची प्रक्रिया/परिक्षा स्थगित करणे अथवा रद्द करणे ,त्यामध्ये अंशत: बदल करणे एकूण संवर्गनिहाय उपलब्ध होणाऱ्या पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करणे , सामाजिक व समांतर आरक्षण, दिव्यांग आरक्षण व इतर आरक्षणामध्ये संवर्गनिहाय व पदनिहाय बदल करणे, तसेच या आयुक्तालयाच्या https://www.icds.gov.in संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या पात्रता ,अटी व शर्ती या रद्द करणे तसेच अटी व शर्ती नव्याने समाविष्ट करणे, या बाबतचे संपूर्ण अधिकार आयुक्त , एकात्मिक बाल विकास सेवा योजना , आयुक्तालय महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांनी राखून ठेवले असून त्यांचा निर्णय अंतीम असेल .तसेच भरती प्रक्रिये संदर्भात दाखल होणाऱ्या तक्रारी संदर्भात अंतिम निर्णय अधिकार आयुक्त , एकात्मिक बाल विकास सेवा योजना , आयुक्तालय महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांना राहतील .

**कैलास पगारे, (भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई**

**स्थळ: नवी मुंबई**
**दिनांक**.10.10.2024